महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग,
प्रकाशगंगा प्लॉट सी-१९, ई-ब्लॉक ४ था मजला, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
Email : ciro@mahatransco.in website : www. mahatransco.in दूरध्वनी क्र. २६५९५०४३ / २६५९५०६४
C.I.N.No. U40109MH2005SGC153646

जा. क्र. मराविपाकंम/काऔसंकवि/वैवीयो/नुतनीकरण/२८६२ दि. २० मे, २०२१

प्रति,
१) मुख्य अभियंता,
अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ,
म.रा.वि.पारेषण कंपनी मर्या.,
अमरावती/औरंगाबाद/कराड/नागपूर/नाशिक/पुणे/वाशी/रा.भा.प्रेषण केंद्र, ऐरोली
२) मुख्य अभियंता (सर्व)
मुख्य कार्यालय, मुंबई

विषय: MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चे सन २०२१-२२ करीताच्या नुतनीकरणाबाबत

म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्या., अंतर्गत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या तिन्ही कंपन्यांतील कार्यरत कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता सन २०२१-२२ या वर्षाकरीता MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चे ओरिएन्टल इंन्शुरन्स कंपनीमार्फ़त नुतनीकरण करण्यात आलेले आहे. पुर्वीच्या वीमा योजनेचा कालावधी दि. १४.०५.२०२१ रोजीच्या मध्यरात्री पासून संपुष्टात आलेला आहे.

२. सदर वैद्यकीय वीमा योजना ही दि. १५.०५.२०२१ ते दि. १४.०५.२०२२ या एक वर्षाच्या कालावधीकरिता सध्या अस्तित्वात असलेल्या अटी व शर्तीनुसार सुरु राहील. त्यानुसार ओरिएन्टल इंन्शुरन्स कंपनी, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच या योजनेकरिता Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. या कंपनीची TPA म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

३. सबब आपणांस कळविण्यात येते की, दि. १५.०५.२०२१ पासून या वैद्यकीय वीमा योजनेअंतर्गत येणारे दावे Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. या कंपनीच्या खालील ई-मेल वर पाठविण्याबाबत आपल्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना अवगत करावे.

Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd.
ई-मेल- msebmediclaim@mediassist.in
संपर्कासाठी दूरध्वनी (Helpline No.) क्र. ०४०६८१७२७२७

४. सदर वैद्यकीय वीमा योजनेसंदर्भात सविस्तर परिपत्रक यथावकाश निर्गमित करण्यात येईल.

(मंगेश शिंदे)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

**प्रत सविनय सादर:**

१. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण, प्रकाशगंगा, मुंबई.
२. संचालक (प्रकल्प)/(प्रकल्प)/(वित्त), महापारेषण, प्रकाशगंगा, मुंबई.
३. कार्यकारी संचालक (पारेषण)/(रा.भा.प्रे.केंद्र)/(मासं) (प्रभारी), महापारेषण, प्रकाशगंगा, मुंबई.
४. मुख्य महाव्यवस्थापक (मासं)/(विवले)/(सुवअं), महापारेषण, प्रकाशगंगा, मुंबई.
५. विभागप्रमुख स्तरावरील सर्व अधिकारी, महापारेषण, मुंबई

महापारेषण

(महाराष्ट्र शासन उपक्रम)
कामगार, औद्योगिक संबंध व कर्मचारी कल्याण विभाग,
प्रकाशगंगा प्लॉट सी-१९, ई-ब्लॉक ४ था मजला, वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
Email : ciro@mahatransco.in website : www. mahatransco.in दूरध्वनी क्र. **२६५९५०४३ / २६५९५०६४**
**C.I.N.No. U40109MH2005SGC153646**

जा. क्र. मराविपाकंम/काऔसंकवि/वैवियो/२०२१-२०२२/**३५९३** दि. **२८ जुन, २०२१**

**परिपत्रक - औ.सं. - ०७**

**विषय:** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२१-२०२२

**संदर्भ:** सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. मराविपाकं/काऔसंकवि/वैवियो/२०२०-२०२१/१९०५. दि. १३.०३.२०२०

म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्या., अंतर्गत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी दिनांक १५.०२.२०२० ते १४.०२.२०२१ या कालावधीतील MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भातील परिपत्रक क्र. मराविपाकं/काऔसंकवि/वैवियो/२०२०-२०२१/१९०५. दि. १३.०३.२०२० पारित करण्यात आलेले होते.

२. MSEB HCL Group Insurance Policy सन २०२०-२१ ची मुदत दि. १४.०२.२०२१ रोजी मध्यरात्री संपुष्टात आल्यामुळे, सदर योजनेच्या शर्ती व अटी कायम ठेऊन पुढील ०३ महिन्यांकरीता म्हणजेच दि. १५.०२.२०२१ ते दि. १४.०५.२०२१ या कालावधीसाठी पुढे सुरु ठेवण्याकरीता मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्यादित यांनी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) व संचालक (मासं), महावितरण तसेच कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती / महापारेषण यांच्याशी विचारविनिमय करुन मंजूरी दिलेली होती.

३. योजनेचा उपरोक्त कालावधी दिनांक १४.०५.२०२१ रोजी संपुष्टात आल्यामुळे मेडिक्लेम योजना सन २०२१-२२ संदर्भात गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार सन २०२०-२०२१ या कालावधीमध्ये सुरु असलेल्या आरोग्य विमा योजनेतील (Mediclaim Policy) अटी व शर्ती कायम ठेऊन सन २०२१-२२ या कालावधीकरीता तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता मूळ राशीभूत विमा रक्कम रु.०५ लाखांची एकच MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy **२०२१-२२ दि. १५.०५.२०२१ पासून पुढे १ वर्ष** कालावधीकरीता सुरु करण्यासाठी मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्यादित यांनी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) व संचालक (मासं), महावितरण तसेच कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती / महापारेषण यांच्याशी विचारविनिमय करुन मंजूरी दिलेली आहे.

**४. सदर आरोग्य विमा योजना सन २०२१-२२ मध्ये फक्त खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत याची नोंद घ्यावी.**

**MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy: २०२१-२२ ची ठळक वैशिष्ट्ये:**

**(योजनेचा कालावधी दि. १५.०५.२०२१ ते १४.०५.२०२२)**

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy 2021-22 ही ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी, पुणे मार्फत सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेचा पॉलिसी **क्रमांक १६३६००/४८/२०२२/७९४** असा असून या योजनेचा कालावधी दि.१४.०५.२०२१ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि. १५.०५.२०२१ (००:०० तासापासून) ते दि. १४.०५.२०२२ च्या मध्यरात्रीपर्यंत (२४:०० तासांपर्यत) असा एक वर्षाचा आहे. सदर योजनेकरीता TPA म्हणून **Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd.** या कंपनीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

२. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२१-२२ ही योजना माहे फेब्रुवारी २०२१ ते माहे एप्रिल २०२१ मध्ये सेवानिवृत्त/मयत झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी लागू राहणार नाही. तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांना योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास वैयक्तिक विमा हफ्ता भरून घेता येईल. याबाबत परिपत्रक क्र. मराविपाकं/काऔसंकवि/सेकविमेयो/३१५४, दि. ०३, जुन २०२१ मध्ये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

३. सदर योजना महापारेषण कंपनीमध्ये दि. १५ मे, २०२१ रोजी सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील जास्तीत जास्त ०५ सदस्यांसाठी लागू राहील. तसेच, या कंपनीमधील सर्व संचालक, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी अशा विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्वांना लागू राहील.

४. सदर योजनेतंर्गत **रु.०५ लाखांपर्यंत** कमाल वैद्यकीय विमा संरक्षण हे कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील खाली नमूद कुटुंबाच्या व्याख्येतील वर्गवारीपैकी कर्मचाऱ्याने निर्देशीत केलेल्या कोणत्याही ०५ व्यक्तींसाठी आहे.

**कुटुंबाची व्याख्या:-**

- कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.
- कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.
  (तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.)
  - १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
  - तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
  - मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
  - कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून आणि त्यांच्याबरोबर राहत असलेल्या त्यांच्या आई-वडीलांची किंवा सासु-सासऱ्यांपैकी एकाचीच निवड करता येईल.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.
- या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

५. मेडिक्लेम योजना सन २०२१-२२ करिता महापारेषण कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून माहे मे, **२०२१ पासून ते माहे एप्रिल, २०२२ पर्यंत दरमहा रु.७००/- (GST सह)** [वार्षिक विमा रक्कम रु. ८४००/- (GST सह)] याप्रमाणे विमा हप्त्याची रक्कम कपात करण्यात येईल.

६. **दि. १५.०५.२०२१ ते दि. १४.०५.२०२२ या कालावधीमध्ये कंपनीच्या सेवेमध्ये नव्याने रुजू झालेल्या/होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत -** कर्मचारी ज्या महिन्यामध्ये कंपनीच्या सेवेत रुजू झालेला आहे त्या महिन्यापासून दरमहा प्रमाणे रु. ७००/- (GST सह) कर्मचाऱ्याच्या मासिक वेतनातून माहे एप्रिल -२०२२ पर्यंत कपात करण्यात यावी.

**टिप :** १) जे कर्मचारी माहे मे-२०२१ मध्ये सेवानिवृत्त अथवा मयत झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांना / त्यांच्या अवलंबितांना (वारसांना) या आरोग्य विमा योजनेचा लाभ दि. १४.०५.२०२२ पर्यंत मिळणार असल्याने अशा कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या वेतनातून वर नमूद केल्याप्रमाणे विमा हप्ता रक्कम एकरक्कमी वार्षिक रु. ८४००/- (GST सह) सन २०२१-२२ च्या योजनेकरिता अशा कर्मचाऱ्यांकडून/ वारसदारांकडून जमा करुन घेण्यात यावी.

२) जे कर्मचारी माहे जून-२०२१ ते एप्रिल २०२२ या कालावधीत सेवानिवृत्त अथवा मयत झाले आहेत / होतील, अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वार्षिक विमा हफ्ता रक्कमेपैकी दरमहा कपात करण्यात आलेली विमा हफ्ता रक्कम वगळता उर्वरीत रक्कम कर्मचाऱ्याच्या शेवटच्या वेतनातून कपात करण्यात यावी.

७. दि. **१५.०५.२०२१ ते दि. १४.०५.२०२२** या योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती (Termination) झाल्यास / किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा (Resignation) स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी मिळणार नाही. तथापि अशा कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या महिन्यापर्यंतची दरमहाप्रमाणे पूर्वी कपात करण्यात आलेली रक्कम वार्षिक विमा रक्कमेमधून (परिच्छेद क्र. ५ नुसार वार्षिक विमा रक्कम) वजा करता शिल्लक असलेली उर्वरित कालावधीची रक्कम (माहे एप्रिल -२०२२

पर्यंतची) एकरक्कमी संबंधित कर्मचाऱ्याच्या शेवटच्या वेतनातून कपात करण्यात यावी. याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भातील दक्षता संबंधित विभागांनी घ्यावी.

**टिप:** उपरोक्तप्रमाणे मेडीक्लेम योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकपणे अदा करण्यात येणारी विमा हप्ता रक्कम आयकर कायद्याच्या कलम - ८० (ड) नुसार सवलतीसाठी पात्र राहील.

८. वर नमूद केल्यानुसार कपात करण्यात आलेल्या विमा हप्त्याच्या रक्कमेच्या लेखांकनासाठी लेखाशिर्ष (Account Head) - १४०२५१ असे राहील.

९. कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारापोटी या योजनेंतर्गत उपलब्ध असलेली मुळ राशीभूत विमा रक्कम रु. ०५ लाख कंपनीच्या फक्त कार्यरत कर्मचाऱ्यासाठी खर्च झालेली असल्यास व तद्नंतर कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांकरीता रु. ०५ लाखापर्यंतच्या विमा योजनेच्या अटी व शर्तीनुसार वैद्यकीय विम्याचा लाभ एक विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याकरीता, संबंधीत कार्यालयाने परिमंडळाच्या मुख्य अभियंता यांच्यामार्फत त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. सदर प्रस्तावास संचालक (वित्त) हे कार्यकारी संचालक (मासं) व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मंजुरी देण्यासाठीचे सक्षम अधिकारी राहतील.

१०. सदर योजनेंतर्गत Cashless OR Non-Cashless वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर उपचारासाठी देण्यात येणाऱ्या कक्षाचे दर खालीलप्रमाणे राहतील.

- सामान्य कक्ष (General Room): Room Rent limited to 0.80% of Sum Insured (Rs. 4000/-) or actual expenses whichever is less.
- अति दक्षता विभागातील कक्ष (ICU Room): Room Rent limited to 1.60% of Sum Insured (Rs. 8000/-) or actual expenses whichever is less.

११. या योजनेतंर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी ३० दिवसांपूर्वीचा व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतरच्या ६० दिवसांपर्यंत केलेल्या उपचारासाठीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे. (Pre hospitalisation upto 30 days and post hospitalisation upto 60 days Covered).

१२. **अवलंबित सदस्यांची व इतर माहिती अद्यायावत करणेबाबत :**

सदर योजनेसाठी दि. १५.०५.२०२१ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. १५.०५.२०२१ ते दि. १४.०५.२०२२ या कालावधीकरिता कुटुंबातील नविन अवलंबित समस्यांच्या नावाचा समावेश अथवा नोंदणीकृत सदस्यांपैकी एखाद्या सदस्याची नोंदणी कायमस्वरुपी काढून टाकणे इ. सुधारित करण्याच्या सुविधा करिता MediBuddy.in या Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. या TPA च्या संकेतस्थळावर **दि. १०.०७.२०२१** पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी आपणास खालील माहिती अद्ययावत करण्याचे पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**१. MediBuddy portal ची login प्रक्रिया : (Portal.medibuddy.in)**

- Access the MediBuddy portal (मेडीबडी पोर्टल उघडा)
- Please login to URL: Portal.medibuddy.in (यु.आर.एल. वर लॉगिन करा : Portal.medibuddy.in)
- Username : MSEBCPF No. (युजर नेम : MSEB without Zero CPF No.)
- Password : MSEBCPF No. (पासवर्ड : MSEB without Zero CPF No.)

**२. मेडिक्लेमचा लाभ घेण्यासाठी संकेतस्थळावर उपलब्ध असलेले विविध पर्याय :**

- View your policy details (आपल्या पॉलिसी संबंधीची संपूर्ण माहिती)
- Get eCashless for provisional pre authorization (ई-कॅशलेस-पुर्व मंजुर कॅशलेस)
- Track Claim in real-time (जमा केलेल्या क्लेमची सद्यस्थिती (प्रगती))
- Submit Claim online (ऑनलाईन जमा करण्याची सुविधा)
- Enrolment and Download your e-cards (ई-कार्ड मिळवण्याची सुविधा)
- Get help and whenever you need it (गरजेच्या वेळेस मदत)
- Search Hospital (मान्यता प्राप्त सर्व रुग्णालयाची यादी)



शिंदे 25/06/21

तसेच दि. १५.०५.२०२१ ते १४.०५.२०२२ या कालावधीकरीता कुटुंबातील नवीन अवलंबित सदस्यांच्या नावाचा समावेश अथवा नोंदणीकृत सदस्यापैकी एखाद्या सदस्यांची नोंदणी कायम स्वरुपी काढून टाकणे किंवा तसेच ठेवणे याकरीता आपणास Enrolment या शिर्षकाखाली **दि. १०.०७.२०२१** पर्यंत Submit करुन Confirm केल्यानंतर कर्मचाऱ्यांना योजनेच्या कालावधीमध्ये कुठल्याही सदस्याचा नव्याने समावेश करता येणार नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी याबाबत विशेष दक्षता घेऊन आपल्या कुटुंबाचे ई-कार्ड काढून ठेवावे.

मात्र, नवविवाहित सदस्यांच्या बाबतीत (लग्न झालेल्या तारखेपासून) व नवजात बालकाच्या बाबतीत (जन्म झालेल्या दिवसापासून ३० दिवसांनंतर) सदस्याची माहिती कर्मचाऱ्यांना त्या त्या वेळेस भरता येईल. याकरिता कर्मचाऱ्यांनी विहित नमून्यातील Excel Sheet संबंधित परिमंडळाच्या सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) यांच्या मार्फत msebmediclaim@mediassist.in यावर ईमेल करुन कर्मचाऱ्यांच्या अवलंबिताची नोंद झाल्याची खात्री करावी. (सोबत: Excel Sheet जोडलेली आहे)

**१३. सामान्य आदेश क्र. २० (क) च्या तरतूदी - (फक्त कर्मचाऱ्यांबाबत)**

**१. वैद्यकीय सुविधा** - कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २० (क), दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील, त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. मात्र कर्मचाऱ्यांस रु. ०५ लाखांपर्यंत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy द्वारेच घ्यावा लागेल. कर्मचाऱ्यांकरीता स्वत:साठी रु. ०५ लाखांपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सामान्य आदेश क्र. २० (क) प्रमाणे लाभ देय राहील.

मात्र, सदर प्रकरणी केवळ कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम ही विमा कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा जास्त असल्यास अशा प्रकरणात सा.स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा. आ. क्र २० (क) दि. १७.०६.१९६३ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी प्रकरणपरत्वे निर्णय घेतील.

**२. वैद्यकीय अग्रीम -**

अ) कर्मचाऱ्यांना कामावर असताना अपघात झाल्यास अथवा तातडीच्या प्रसंगी ज्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले ते रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये नसेल तर परिमंडळ कार्यालयांकरिता सहाय्यक महाव्यवस्थापक (मांस) यांनी कर्मचाऱ्याच्या सदर प्रकरणाची माहिती Medi Assist कंपनीस दूरध्वनीद्वारे (MSEB Mediclaim Help Line No. 04068172727) देवून २४ तासांच्या आत प्राथमिक दावा / सुचनांच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नाव, भ.नि.नि. क्रमांक, रुग्णाचे नाव, रुग्णालयाचे नाव व पत्ता इ. माहितीचा ईमेल देखील msebmediclaim@mediassist.in यावर पाठवावा.

ब) त्यानंतर, सा. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा. आ. क्र २० (क) दि. १७.०६.१९६३ मधील तरतूदींच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रकरण परत्वे कर्मचाऱ्यास वैद्यकीय उपचारासाठी अग्रीम रक्कम मंजूर करावी.

क) कर्मचाऱ्यास वरील प्रकरणी वैद्यकीय अग्रीम महापारेषण कंपनीकडून मंजूर करण्यात आला असल्याची सुचना Medi Assist कंपनीस ईमेलद्वारे msebmediclaim@mediassist.in वर द्यावी.

ड) अप्राणांतिक अपघाताच्या अथवा इतर तातडीच्या आजारांच्या घटनेमध्ये प्रकरणपरत्वे रुग्णालयास कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारासाठी कंपनीकडून अग्रीम रक्कम दिलेली असल्यास कर्मचाऱ्याने रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर तातडीने वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे सादर करावा. संबंधीत कार्यालयाने सदर प्रस्तावासोबत वैद्यकीय अग्रीम म्हणून रुग्णालयास अदा केलेल्या रक्कमेच्या पावतीची छायांकित प्रत व संबंधीत कार्यालयाचा बँक खाते क्रमांकासह IFSC Code ची माहिती देवून सदर प्रकरणी मंजूर होणारी रक्कम कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठीचे स्वतंत्र पत्र जोडून प्रस्ताव संबंधित परिमंडळाच्या सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) यांच्यामार्फत Medi Assist कंपनीकडे पाठवावा. Medi Assist कंपनीकडून या प्रकरणी मंजूर रक्कम संबंधीत कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा होईल, त्यानंतरच संबंधीत कार्यालयाने अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा. सदर प्रकरणी संबंधित परिमंडळाच्या सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) यांनी Medi Assist कंपनीकडे पाठपुरावा करावा.

इ) प्राणांतिक अपघाताच्या घटनेमध्ये अथवा वैद्यकीय उपचाराप्रसंगी दुर्देवाने मृत्यु झाल्यास अग्रीम रक्कम मंजूर करुन रुग्णालयास सदर रक्कमेचा धनादेश अदा केला असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास सदर रक्कमेची देयके अदा करण्यात यावीत.

**३ वैद्यकीय प्रतिपूर्ती :**

- कर्मचारी / कुटुंबीयाने Medi Assist कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये उपचार घेतले नसतील व सदर रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी नसेल तर कर्मचारी / कुटुंबातील सदस्यांने Medi Assist कंपनीकडे **MSEB Mediclaim**

**Help Line No. 04068172727** यावर दुरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे २४ तासांच्या आत प्राथमिक दाव्याबाबत १३ (२) च्या `अ` मध्ये नमूद केल्यानुसार सुचना द्यावी. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर तातडीने झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव Medi Assist कंपनीकडे प्रतिपूर्ती दावा कार्यपध्दतीमध्ये नमूद केल्यानुसार (Medi Assist कंपनीच्या संकेतस्थळावर नमूद केल्यानुसार) योग्य ती सर्व कागदपत्रे जोडून संबंधीत परिमंडळ कार्यालयात उपस्थित Medi Assist कंपनीच्या समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांच्यामार्फत Medi Assist कंपनीकडे पाठविणे बंधनकारक आहे.

- सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर Medi Assist कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने रु. ०५ लाख मर्यादेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम मंजूर केली जाईल. सदर रक्कम कर्मचाऱ्याने अथवा अवलंबिताने प्रस्तावासोबत दिलेल्या IFSC Code नुसार बँकेच्या खात्यावर Medi Assist कंपनीकडून परस्पर वर्ग करण्यात येईल.
- कार्यरत कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्याप्रकरणी अथवा तातडीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यास वैद्यकीय अग्रीम अदा केला असल्यास १३.२ च्या 'ड' व 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.
- उपरोक्त प्रकरणी वैद्यकीय उपचारासाठी फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चाची रक्कम ही रु. ०५ लाख यापेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणी सा. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा. आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ मधील तरतूदींच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

१४. कर्मचाऱ्यांना MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy 2021-22 संदर्भात, स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरीता मदतीची अथवा चौकशीची गरज असल्यास कर्मचारी अथवा त्याचे कुटुंबिय Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd. (T.P.A.) कंपनीने नियुक्त केलेल्या नोडल ऑफिसर कडून माहिती अद्ययावत करुन घ्यावी.

**Medi Assist कंपनीचा पत्रव्यवहार व वैद्यकीय प्रतिपूर्तीचे दावे दाखल करण्यासाठीचा पत्ता -**

**Medi Assist Insurance TPA Pvt. Ltd.**
**१०१, सी विंग, माणिकचंद आयकॉन,**
**ढोले पाटील रोड, पुणे- ४११००१.**
MSEB Mediclaim Help Line No. **04068172727**
**(Email ID:** msebmediclaim@mediassist.in**)**

१५. सदर परिपत्रक महापारेषण कंपनीच्या ep.mahatransco.in या संकेतस्थळावरील HR Department → Industrail Relations Department च्या Tab मध्ये **MSEB HCL Group Medicalim Insurance Policy (२०२१-२२)** या शिर्षकाखाली उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारित करण्यात येणार नाही.

शिंदे 28/06/21

(मंगेश शिंदे)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

**प्रति,**
सर्व कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी, महापारेषण.

*****

D:\INDUSTRIAL RELATION\Bharat Sir\Medicalim Policies\Mediclaim Transco\Mediclaim Policy 2021\Mediclaim Policy Circular 2021-2022.doc